वाचले :—१ जिल्हा न्यायालय, नांदेड कार्यालयीन आदेश क्र. ४(१)/५०७१/२०२०, दिनांक ०३.११.२०२०

२ नांदेड जिल्हा न्यायीक विभागाच्या सल्लागार समितीच्या दिनांक १७.१२.२०२० रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

— — — —

## — : कार्यालयीन आदेश : —

ज्याअर्थी, संदर्भात अ. क्र. १ येथे नमुद आदेशानुसार नांदेड जिल्हा न्यायिक विभागाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीकाच्या रिक्त पदांवर दिलेल्या प्रथम नियुक्तीनुषंगाने, कनिष्ठ पदाच्या निवड / प्रतिक्षा यादीतील अ. क्र. ८६ वरील उमेदवार श्री आशिष गणेशराव कल्याणकर हे आपल्या प्रथम नियुक्तीच्या ठिकाणी आदेशाची बजावणी झाल्यापासून विहित एक महिन्याच्या कालावधीत रुजू झाले नाहीत.

आणि ज्याअर्थी, संदर्भात अ. क्र. २ येथे नमूद सल्लागार समितीच्या बैठकीत, सदर उमेदवार आपल्या प्रथम नियुक्तीच्या पदावर विहित एक महिन्याच्या कालावधीत रुजू न झाल्यामुळे त्यांना दिनांक ०३.११.२०२० रोजीच्या आदेशानुसार दिलेली प्रथम नियुक्ती रद्द करण्यांत येऊन त्यांचे नाव कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड / प्रतिक्षा यादीतून वगळण्यांत येण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला आहे.

त्याअर्थी, मी श्रीराम रा. जगताप, प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड याद्वारे कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र. ८६ वरील उमेदवार श्री आशिष गणेशराव कल्याणकर यांची दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, हदगांव आस्थापनेवर पूर्णत: तात्पूरत्या व अस्थायी स्वरुपात दिलेली प्रथम नियुक्ती याद्वारे तात्काळ प्रभावाने रद्द करीत असून पुढे निर्देशित करतो की, श्री आशिष गणेशराव कल्याणकर यांचे नाव नांदेड जिल्हा न्यायीक विभागासाठीच्या कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड / प्रतिक्षा यादीतून तात्काळ प्रभावाने वगळण्यांत यावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड )
) 17/12/2020
दिनांक:—१७.१२.२०२० )

( श्रीराम रा. जगताप )
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

— — — — —

जा.क्र.ब—४(१)/6859/२०२०

प्रती —

— दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, हदगांव.
— दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, मुदखेड
यांचेकडे संबंधीतावर बेलीफा मार्फत बजावणीकामी

प्रतिलिपी –

- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड
- सहा. अधिक्षक, वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड
- श्री आशिष गणेशराव कल्याणकर, रा. २८– मंदिराजवळ, मुदखेड, ता. मुदखेड, जिल्हा नांदेड महाराष्ट्र – ४३१ ७४५ यांना **<u>नोंदणीकृत पांच देय डाकेने</u>**.
- आदेशाची एक प्रत या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जावी.

17.12.2020

जिल्हा न्यायालय, नांदेड )
)
दिनांकः–१७.१२.२०२० )

**प्रबंधक**
**जिल्हा न्यायालय, नांदेड**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
नांदेड

० ० ०